# Quadrant II – Transcript and Related Materials

**Programme: B.A./B.COM/B.SC**

**Subject: Marathi**

**Paper Code: MRG 102**

**Paper Title: प्रसारमाध्यमेःलेखनकौशल्यःबातमीलेखन (WRITING SKILLS FOR MEDIA)**

**Unit: 2**

**Module Name: बातमीलेखनाचे तंत्र**

**Module No: 9**

**Name of the Presenter: Miss. Sonia M. Sawant**

---

## Transcript

जगामध्ये घडणाऱ्या घटनांविषयी प्रत्येकाच्या मनात काही ना काही तरी कुतूहल असते. ते पूर्ण करायचे काम प्रसारमाध्यमे करत असतात. बातमी मिळविणे , तिचे लेखन करणे, तिच्यावर योग्य संस्कार करणे हे कौशल्याचे काम असते. बातमी लेखन करताना त्याचे काही नियम पाळावे लागतात. तिची तांत्रिक बाजू असते. ती समजून घेणे इष्ट आहे.

1. **बातमी मांडणीचा क्रम**

   सोप्या आणि थोड्या शब्दांत मथळा परिणामकारक लिहावा. एखादी घटना, सरकारी निर्णय किंवा धक्का देणारी घडामोड प्रथम सांगणे महत्त्वाचे आहे. त्यानंतर त्याचा तपशील व स्पष्टीकरणाचा मजकूर द्यावा लागतो. बातमीत अत्यंत महत्त्वाचा भाग शिरोभागी असावा. त्यानंतर गौण भाग शेवटी द्यावा.

2. **वर्तमानपत्रासाठी बातमीलेखनाचे तंत्र**

बातमी संक्षिप्त रूपात आणि अचूक असावी लागते. बातमीमध्ये स्थळ, वेळ, वार, प्रसंग याची अचूक नोंदणी करणे गरजेचे आहे. बातमी वाचल्यानंतर वाचकाच्या मनात कसलीच शंका राहू नये. बातमी परिपूर्ण म्हणजेच संपूर्ण असावी. ती अर्धवट

असू नये. बातमी साधार असावी. जगावेगळी बातमी असल्यास ती चौकटीत द्यावी.

- **वर्तमानपत्रातील निवेदनाची मांडणी**

  बातमीचा मथळा दिल्यानंतर स्थूल स्पष्टीकरण द्यावे. वक्त्याचे विधान- ३ ते ४ ओळीत द्यावे. वक्ता कोठे , कोणत्या सभेत बोलला , कोणत्या श्रोत्यांपुढे बोलला, कोणत्या निमित्ताने बोलला याची माहिती द्यावी. त्यानंतर 'मंत्रीमहोदय- प्रमुख पाहुणे पुढे असे म्हणाले' - अशी शब्दसंहिता वापरून नवीन परिच्छेद करावा लागतो. नंतर भाषणाचा सारांश येईल. वक्त्याच्या संपूर्ण नावाचा उल्लेख प्रारंभी एकदाच करा वा. याचा परीणाम असा की ठरीव शब्दांची पुनरूक्ती टाळता येते.

3. **बातमीची भाषा -** बातमी क्लिष्ट असू नये. बातमीमध्ये दुर्बोधता नको. बातमी साध्या सोप्या भाषेत असावी. मुद्याप्रमाणे नटवलेल्या आलंकारिक भाषेत ती नसावी.
4. **बातमीतील कायदेशीर बाबी -** बातमी कायदेशीर म्हणजे रूढ संकेतांचा भंग करणारी असू नये. बातमी लिहिताना समाजाच्या भावना चेतावतील , भडकतील असे लिहू नये. बातमीमध्ये धार्मिक आणि सामाजिक वाद निर्माण होतील असा तपशील असू नये. बातमीत अश्लीलता, ओंगळपणा असू नये. याचा परीणाम म्हणजे समाजातील भडकपणा वाढतो. संतप्तता निर्माण होते.
5. **आकाशवाणीसाठीचे बातमी लेखन तंत्र --** आकाशवाणी हे श्राव्य माध्यम आहे हे लक्षात घेतले तर त्याचे स्वरूप वेगळे असल्याचे जाणवते. आकाशवाणीसाठी बातमीलेखन करताना बातम्यांची शीर्षके स्थूल स्वरूपात आधी सांगावी. बातमीच्या शीर्षकाचा पुनरूच्चार करून त्या संदर्भातील तपशील द्यावा. संमीश्र स्वरूपाचा श्रोतृवर्ग असल्यामुळे सोप्या भाषेचा वापर करणे सोईचे ठरते. बातमीच्या प्रसारणाचा कालावधी कमी असल्याने बातमी संक्षिप्त असावी. आकाशवाणीच्या बातम्यात योग्य निवेदनाची जोड असावी.
6. **दूरदर्शनसाठी बातमीलेखन – तंत्र-** या बातमीचे लेखनसुद्धा सोप्या व सुटसुटीत भाषेत करावे. बातमीसाठी पूरक प्रसंग असावेत. दृक - श्राव्य माध्यम असल्यामुळे घटनांची छायाचित्रे दाखवा वी लागतात याचे भान असावे. पूरक आणि सूत्रबद्ध संहिता लेखन करणे इथे अपेक्षित आहे. बातमीचा क्रम लक्षात

घेता प्रथम मथळा त्यानंतर  मथळ्यांचा पुनरूच्चार नंतर बातमीतील  तपशील देणे आवश्यक आहे. पुन्हा घडामोडींचा आढावा शेवटी घ्यावा लागतो. प्रसारमाध्यमे आज गतिमान बनली आहेत म्हणून त्यासाठी बातमी लेखन करणे हे अत्यंत जोखमीचे आणि कौशल्याचे काम आहे. कुठल्या प्रसारमाध्यमांसाठी आपण बातमी लिहित आहोत याचे भान ठेवूनच बातमी लेखन करावे लागते कारण प्रत्येक माध्यमांची वैशिष्ट्ये निरनिराळी आहेत. आज प्रसारमाध्यमांच्या सृष्टीत संगणक, इंटरनेट, फॅक्स,, टि.व्ही, भ्रमणध्वनी, अशा अनेक तंत्रज्ञानाने विकसित गोष्टींचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. त्यामुळे घरबसल्या कानाकोपऱ्यातीलच नव्हे तर सृष्टीतल्या कानाकोपऱ्यातील बातम्या व छायाचित्रे आपण पाहू व ऐकू शकतो. मंगळावर काय आहे, चंद्रावर काय आहे, गुरू ग्रहावर काय आहे, तेथे काय संशोधन चालू आहे याची चलतचित्रे चित्रफितीव्दारे दूरचित्रवाणीव्दारे आपण पाहू शकतो व ऐकू शकतो. जगातल्या छोट्यातल्या छोट्या गोष्टी आणि मोठ्यातल्या मोठ्या गोष्टी आपण या विकसित प्रसारमाध्यमांव्दारे पाहू व ऐकू शकतो. ही आज प्रसारमाध्यमांने केलेली मोठी प्रगती आहे.

- **समारोप**

बातमी प्रामुख्याने माहिती मिळविण्याचे काम करते.   बातमीचा वाचक वर्ग , श्रोतृ वर्ग , प्रेक्षक वर्ग हा सर्व स्तरावरचा (सुशिक्षित- अशिक्षित) असतो हे समजून बातमीलेखन करणे गरजे आहे. बातमीतील माहिती सर्व समाजापर्यंत योग्य शब्दांत पोहोचेल याची काळजी घेणे हे आपले बातमी लेखक या नात्याने परमकर्तव्य आहे.